# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ३२

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार दि. ३१/१०/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. १३९६**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. १/९/२०१९ ते दि. ३०/९/२०१९ पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/३४६५ दि.१७/१०/२०१९ चे पत्र.

### सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. १३९७**

श्री.शंकर भिमराव अडागळे, सेवानिवृत्त मुकादम यांचा निलंबन कालावधी सेवाकाळ समजून सदर कालावधीतील सर्व आर्थिक लाभ देण्याबाबत पुणे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. २७५३ दि.२५/२/२०११ मे.शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१ अन्वये प्राप्त अधिकारात विखंडीत केला असल्याची बाब मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ३३९० दि.२३/१०/२०१९ चे पत्र.

### ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. १३९८**

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात ढेकूण व झुरळे नाशक फवारणी करण्यासाठी १०० चौ. फुट क्षेत्रफळाच्या खोलीसाठी र.रू. ३०० आकारणे बाबत मा.सौ.आरती कोंढरे व मा.सौ.मनिषा लडकत यांचे दि.११/७/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ५३३ दि. ६/८/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आरोग्य/६४८ दि.२२/१०/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

### सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. १३९९**

जैन स्थानक रामचंद्र सभागृह ते साईकृपा सोसायटी परिसरातील रस्ता विकसित करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.यशराज ग्लोबल इन्फ्राकॉन एलएलपी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,३१,४६,८०४=११ पेक्षा १२.०००३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,१५,६९,१४८=१७ पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रुपये १५,७७,६१६=४९ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये १,७९,१४८=४५ पर्यंत अधिक मटेरीयल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २८,१९४/- पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६५० दि. २३/१०/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १४००**

एसएनडीटी पंपींग व पाषाण पंपींग तसेच बुस्टर पंपींग येथील वार्षीक देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदेश इलेक्ट्रीकल ॲण्ड कॉंट्रक्टर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,९९,३७३=१२ पेक्षा ४.५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४७,७४,४०१=३२ रक्कमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/६५३ दि. २३/१०/२०१९ चे पत्र.

**संकिर्ण**

**विषय क्र. १४०१**

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील मा.संचालक मंडळ सभा क्र. ५ दि.६/३/२०१९ वित्तीय वर्ष २०१९–२० मधील मा.संचालक मंडळ सभा क्र. १ दि.३/७/२०१९, मा.संचालक मंडळ सभा क्र. २ दि.१८/७/२०१९ व मा.संचालक मंडळ सभा क्र. ३ दि.७/९/२०१९ रोजीच्या सभेचा वृत्तांत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.कंपनी सेक्रेटरी आणि विधी अधिकारी, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचे जा.क्र. पीएमपीएमएल/सीएसॲण्ड एलओ/३९४४ दि.१७/१०/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १४०२**

पुणे शहरातील माणिक नाला, नागझरी नाला व अंबिल ओढ्यातील मुख्य मलवहिन्यांची देखभाल व दुरुस्ती करणे व तदनुषंगिक कामे करणे या कामाचे मान्य मा.स्थायी समिती ठराव क्र. २५०९ दि. १४/२/२०१९ च्या ठरावातील टिप – वगळून दुरुस्त/सुधारित ठराव करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/६५१ दि.२३/१०/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १४०३**

एच.सी.एम.टी.आर. प्रकल्पाचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणेकामी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६५२ दि.२३/१०/२०१९ चे पत्र.

१) मे.स्तुप कंन्सल्टंट प्रा.लि. यांची एच.सी.एम.टी.आर. प्रकल्पाचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणेकामी नियुक्ती करणेस, त्यापोटी होणारी सल्लागार फी र.रुपये १.९३ कोटी पर्यंत काम करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**